दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.१६ फेब्रुवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १७२ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 16 Feburary 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 172 • Pages 4 • Rate 4 Rs

### भारताचा पाकिस्तानवर सर्वात मोठा विजय


**मुंबई**–टी-२० विश्वचषकात भारताने पाकिस्तानचा ६१ धावांनी पराभव केला. स्पर्धेच्या इतिहासात धावांच्या बाबतीत भारताचा पाकिस्तानवरचा हा सर्वात मोठा विजय आहे. या विजयासह भारतीय संघ सुपर ८ फेरीसाठी पात्र ठरला. सलग तीन विजयांसह हा संघ ग्रुप अ पॉइंट टेबलमध्ये अव्वल स्थानावर आहे.रविवारी कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर १७६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तान १८ षटकांत ११४ धावांतच सर्वबाद झाला. उस्मान खानने सर्वाधिक ४४ धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराह, अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती आणि हार्दिक पंड्या यांनी प्रत्येकी दोन विकेट घेतल्या.तत्पूर्वी, नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी केल्यानंतर भारताने २० षटकांत ७ गडी गमावून १७५ धावा केल्या. इशान किशनने ४० चेंडूंत ७७ धावा केल्या, ज्यात १० चौकार आणि तीन षटकारांचा समावेश होता. कर्णधार सूर्यकुमार यादवने ३२ धावा केल्या. सईम अयुबने ३ विकेट घेतल्या.

# भारत आणि अमेरिका करारामध्ये सोयाबीन-कापूस आयातीचा उल्लेख नाही

## शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचा फडणवीस यांचा सल्ला

### अफवांवर विश्वास नको

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत– अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली असल्याचे मुख्यमंत्री म्हण**




**मुंबई । प्रतिनिधी**

आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल, असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.परळीतील अंबेजोगाई रस्ता लगत असलेल्या ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभाग आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. भारत-अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा उल्लेख नसून शेतकऱ्यांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन देखील त्यांनी केले.मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम (उश्रळारींश ठळीज्ञ) कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन 'राज्यमाता' दर्जा दिला आहे.विदर्भ मराठवाडा दुग्धोत्पादन प्रकल्प आणि पशुधन विकास महामंडळ नागपूर यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य कराराचे प्रतिकात्मक हस्तांतरण यावेळी करण्यात आले. पशुधन विकास मंडळ नागपूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी शितल मुकणे आणि मुख्य शास्त्रज्ञ महात्मा फुले कृषी विद्यापीठ सोमनाथ माने त्यासोबतच डॉ. दिनकर बोर्डे उपायुक्त पशुसंवर्धन जिल्हा परिषद सातारा व विदर्भ मराठवाडा उत्पादन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजय गोराडे यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कराराच्या प्रति हस्तांतरित करण्यात आल्या.

### तंत्रज्ञानाची कास: AI आणि एम्ब्रियो ट्रान्सप्लांट

**दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले की, पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) मिशन' चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ- मराठवाड्यात 'मदर्स डेअरी' सोबत करार देखील करण्यात आला आहे.**

## वैतरणा नदीपात्राजवळ युवक ट्रेनमधून पडला; तिघांच्या धाडसाने बचावला




दैनिक वादळ वार्ता
**पालघर । प्रतिनिधी**

वैतरणा नदीपात्राजवळ मंगळवारी रात्री घडलेल्या अपघातात भोईसर येथील उद्यन वांगड हा युवक चालत्या ट्रेनमधून खाली पडून गंभीर जखमी झाला. ही घटना बुधवारी रात्री सुमारे १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान घडली.घटनेची माहिती मिळताच स्थानिक तरुण गुरु पाटील, साई पाटील आणि रेल्वे कर्मचारी रमेश सिंग यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. नदीपात्रालगत जखमी अवस्थेत पडलेल्या युवकापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांनी बोटीचा वापर केला. त्यानंतर युवकाला सुरक्षित बाहेर काढून तातडीने वैद्यकीय उपचारासाठी पाठवण्यात आले.वेळीच मिळालेल्या मदतीमुळे युवकाचा जीव वाचल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पुढील तपास सुरू आहे.

## शिक्षकांचे निलंबन नाही तर संस्थाचालकांवर गुन्हे
## जैतापूर सामूहिक कॉपीप्रकरणी शिक्षण आयुक्तांचे आदेश

दैनिक वादळ वार्ता
**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

जैतापूर येथील राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात बारावीच्या पेपरला पहिल्याच दिवशी सामूहिक कॉपीचा प्रकार उघडकीस आला. केंद्रावर शिक्षकच कॉपी पुरवत असल्याचे समोर आले. यावर शिक्षण विभागाने जिल्हा परिषदेच्या ३ शिक्षकांवर त्वरित निलंबनाची कारवाई केली व गुन्हे नोंदवले. मात्र, संबंधित खासगी विद्यालयातील शिक्षक व देभेगाव येथील न्यू हायस्कूलमधील शिक्षकांवर शिक्षण विभागाने आदेश देऊनही कारवाई केली नाही. आता याप्रकरणी संस्थांनी संबंधितांवर २ दिवसांत कारवाई न केल्यास शिक्षण संस्थाचालकांवरच गुन्हे दाखल करा, असे आदेश शिक्षण आयुक्तांनी दिले आहेत.माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे १० फेब्रुवारीपासून बारावीची परीक्षा सुरू झाली. परीक्षेच्या पहिल्या दिवशी, इंग्रजीच्या पेपरला राष्ट्रीय माध्यमिक व उच्च माध्यमिक या केंद्रावर शिक्षक कॉपी पुरवत होते. त्याचे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात चित्रीकरण झाले. या प्रकरणी २४ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जिल्हा परिषदेने ३ जणांना निलंबित केले आहे. परीक्षेसाठी खासगी शिक्षण संस्थांची कर्मचाऱ्यांनी नियुक्ती केली जाते. कॉपी प्रकरणात सहभागी शिक्षकांवर कारवाईचे अधिकार शिक्षण संस्थाचालकांना आहेत. संबंधित संस्थाचालकांनी या कर्मचाऱ्यांवर



कारवाई करावी, असे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र, त्यांच्यावर कारवाई झालेली नाही.या प्रकरणात शिक्षणाधिकाऱ्यांनी संबंधित संस्थाचालकांनी कारवाई करावी. २ दिवसांत कारवाई न केल्यास शिक्षण संस्थाचालकांवर गुन्हा दाखल करावा, असे आदेश दिले आहेत. यासंदर्भात शिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवले आहे. त्यानंतर शिक्षणाधिकाऱ्यांनी संस्थेचे अध्यक्ष आणि सचिव यांना पत्राद्वारे कारवाईबाबत कळवले आहे, असे माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी सांगितले.ंस्थेच्या स्तरावरून संबंधिताविरुद्ध निलंबनाची कार्यवाही करावी. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करावा. संस्थांनी असे न केल्यास शिक्षण आयुक्तांनी त्यांच्यावर कारवाईचे आदेश दिले आहेत, अन्यथा वेतनही थांबवण्यात येईल, असे या पत्रात म्हटल्याची माहिती शिक्षणाधिकारी लाठकर यांनी दिली.

# केज नगरपंचायतीचा कारभार म्हणजे भ्रष्टाचाराचाच बाजार!

## घरकूल महाघोटाळ्यात मातब्बर पुढारी अडकणार? ;प्रधानमंत्री आवास योजनेचे अनुदान लाभार्थी सोडून इतरांच्या खात्यात

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीचा कारभार सध्या भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे. पंतप्रधान आवास योजना (शहरी) अंतर्गत गोरगरिबांसाठी मंजूर झालेल्या घरकुल अनुदानात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या महाघोटाळयात नगरपंचायतीतील काही मातब्बर पुढारी आणि अधिकारी अडकण्याची शक्यता व्यक्त होत आहे.विश्वसनीय सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या अनेक लाभार्थ्यांच्या खात्याऐवजी संबंधित रक्कम इतर व्यक्तींच्या किंवा मध्यस्थांच्या खात्यात जमा करण्यात आल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. काही लाभार्थ्यांना तर अनुदान मिळालेच नसल्याचे सांगितले जात असून, त्यांच्या नावावर मात्र कागदोपत्री घरकुल पूर्ण झाल्याची नोंद करण्यात आली आहे.

या योजनेचा उद्देश आर्थिकदृष्ट्या दुर्बल




घटकांना स्वतःचे हक्काचे घर मिळावे हा असताना, केज नगरपंचायतीत मात्र या योजनेचा गैरफायदा घेऊन लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून केला जात आहे. कागदोपत्री घरकुल मंजूर, प्रत्यक्षात मात्र घरच नसल्याची अनेक प्रकरणे उघडकीस येत आहेत. या प्रकरणाबाबत जिल्हा प्रशासनाने प्राथमिक चौकशी सुरू केल्याचे समजते. संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यांची तपासणी, मंजूर घरकुलांची प्रत्यक्ष पाहणी तसेच नगरपंचायतीतील नोंदींची पडताळणी केली जात आहे. चौकशीत दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. दरम्यान, केज नगरपंचायतीतील सत्ताधारी मंडळींवर नागरिकांचा विश्वास डळमळीत झाला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी होत आहे. गोरगरिबांच्या हक्काच्या घरकुलावर डल्ला मारणाऱ्यांना शासनाने माफी देऊ नये, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत. या प्रकरणामुळे केज नगरपंचायतीचा कारभार आणि पारदर्शकतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, आगामी काळात हा घरकूल महाघोटाळा मोठ्या राजकीय व प्रशासकीय वादाचे कारण ठरण्याची शक्यता आहे.

## शेतकऱ्यांनी के वाय सी सह आधार सादरीकरण करावे शेतीकर्ज माहिती पोर्टल साठी आधार अनिवार्य-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील शेती क्षेत्रात अमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी तसेच कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाकडूनआपत्कालीन व दीर्घकालीन उपाय योजना राबविण्यात येत असून त्या अनुषंगाने शेती कर्जाची माहिती शासना च्या पोर्टलवर भरण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे या प्रक्रियेसाठी सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांचे केवायसी करणे अनिवार्य असल्याने आधार क्रमांक आवश्यक आहे.त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी तातडीने आपले आधार कार्ड संबंधित संस्थाकडे जमा करावेत असे आव्हान ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे. जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्यात आलेला आहे मात्र बहुतांश शेतकऱ्याचे आधार कार्ड संबंधित संस्थाकडे उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे.यामुळे केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्यात अडचणी निर्माण होत आहेत शासनाच्या पोर्टलवर



अचूक व संपूर्ण माहिती भरण्यास अडचणी येत आहेत शेती कर्ज पुनर्रचना थकीत कर्जा बाबत निर्णय तसेच भविष्यातील शासकीय योजना याचा लाभ शेतकऱ्यांना सुरळीतपणे मिळावा यासाठी केवायसी अत्यंत महत्त्वाची आहे.त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था किंवा बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँके कडून कर्ज घेतले आहे त्यांनी आपले आधार कार्ड संबंधित गट सचिव व बँकेच्या शाखाधिकार्या कडे त्वरित जमा करावेत असे आवाहन करण्यात आले आहे मयत शेतकऱ्याच्या वारसांनी संबंधित सेवा सहकारी संस्था व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत वासाची नावे नोंदवून आवश्यक त्या कागद पत्रासह आधार कार्ड सादर करावेत असेही आव्हान ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने सर्व शेतकऱ्यांना करण्यात येत आहे व या बाबीचा गांभीर्यपूर्वक विचार करून सर्व शेतकऱ्यांनी या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन वेळेत केवायसी पूर्ण करावी जेणेकरून शासनाच्या योजनेचा लाभ कोणत्याही अडथळ्याशिवाय आपणास मिळू शकेल असे आवाहनही बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.;

# संपादकीय

## कॉपीमुक्ती कधी होणार ?



राज्यात दहा हजारांहून अधिक उच्च माध्यमिक विद्यालये, कनिष्ठ महाविद्याले यांतील १५ लाख ३२ हजारांहून अधिक विद्यार्थी तीन हजार ३८७ केंद्रांवरून बारावी परीक्षेला सामोरे जात आहेत. मराठवाड्यातील सहा लाख विद्यार्थ्यांचा समावेश आहे. ठरावीक टक्क्यांपर्यंत गुण मिळवले तरच वैद्यकीय, अभियांत्रिकीसह कला व वाणिज्य शाखेतील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवता येतो. दोन वर्षे ठरावीक ध्येय गाठताना बोर्डाच्या परीक्षेकडे दुर्लक्ष होऊ नये, हा त्याचा मागचा हेतू असावा. ही परीक्षा आणि कॉपी हे समीकरण मिटविण्यासाठी राज्यात गेल्या काही वर्षांपासून अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत. सीसीटीव्हीच्या रूपाने थेट परीक्षा हॉलमध्ये नवा पहारेकरी आला. नियंत्रण कक्ष, बैठे पथक, ड्रोन, व्हिडीओ चित्रीकरण, भरारी पथक, दक्षता पथक अन त्यांच्या बैठकांची गर्दी अशा प्रशासकीय योजनांची यादी दरवर्षी लांबत आहे. तरीही 'कॉपीमुक्त' परीक्षेसमोरील गतीरोधक कमी झालेले दिसत नाहीत.इंग्रजीच्या पहिल्याच पेपरला शिक्षकांच्या 'सहकार्याने' सामुदायिक कॉपीचे प्रकार समोर आले. प्रश्नांची उत्तरे शोधताना शिक्षकांनी परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी पुढे येत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर केला. त्याने सारी यंत्रणाच चक्रावून गेली आहे. परीक्षेसाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने अनेक उपाययोजना परीक्षा केंद्रांमध्ये करायला भाग पाडले. प्रत्येक कक्षात सीसीटीव्हीसह भरारी, बैठे पथक नियुक्त केले. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात तर टोकन पद्धती तपासणी प्रयोग राबविण्यात येत आहे. एवढे करूनही पहिल्याच दिवशी सामुदायिक कॉपीचा धक्कादायक प्रकार अनेक केंद्रांवर घडला. मग नेमके कॉपीमुक्त परीक्षा अभियान कुणासाठी, हा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित झाला आहे.राज्य मंडळाने परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी सर्वच परीक्षा केंद्रांवर व वर्गखोल्यांमध्ये सीसीटीव्हीची सक्ती केली. पर्यवेक्षकासह तिसऱ्या डोळ्याचीही विद्यार्थ्यांवर नजर आहे. जिथे सीसीटीव्ही नाहीत ती केंद्रे पुढील वर्षी बंद केली जातील, असे मंडळाने जाहीर केले. पण जिथे सीसीटीव्ही आहेत तिथे सामुदायिक कॉपी झाल्याचे समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. सीसीटीव्हीत चित्रित झालेला सामुदायिक कॉपीचा प्रकार व्हायरल झाला आणि परीक्षापद्धतीचा ढिसाळ कारभार पुन्हा चर्चेत आला आहे. शिक्षणाधिकाऱ्यांच्या भेटीत केंद्रांवरील विस्कळित बैठक व्यवस्था, शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थी कॉपी करत असल्याचे सीसीटीव्हीत पाहून अधिकारी चक्रावून गेले. एकाच केंद्रावर २०हून अधिक जणांवर गुन्हे नोंदविण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली. प्रश्नांची उत्तरे शोधताना शिक्षकांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा लीलया उपयोग केला. कृत्रिम बुद्धिमता (एआय) तंत्रज्ञानाद्वारे विद्यार्थ्यांना मदत केली गेली, असे समोर येत आहे. मागची परीक्षाही अनेक गैरप्रकारांनी चर्चेत राहिली. यंदा नमनालाच कॉपीमुक्तीचा फज्जा उडाला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. परीक्षेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शिक्षण विभागासह महसूल, पोलिस प्रशासनही सहभागी झाले, त्याला पंधरा वर्षे उलटून गेली. पण कॉपी रोखण्यात पूर्णपणे यश आलेले नाही. याची कारणे राज्याच्या शिक्षण विभागाला शोधावी लागणार आहेत. बारावीची परीक्षा संपत नाही तोच दहावीची परीक्षा सुरू होईल. केवळ प्रशासकीय निर्णय जाहीर करून आणि उपाययोजनांची जंत्री दाखवून कॉपीमुक्तीची अंमलबजावणी होणार नाही. सर्व परीक्षा केंद्रांवर देखरेख ठेवण्यासाठी प्रभावी यंत्रणा, परीक्षा केंद्रांना जोडणे, कॉपी प्रकरण उघडकीस आल्यानंतर तत्काळ कारवाई अशी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. तरच कॉपीमुक्तीचा लढा यशस्वी होईल.

# मुलाच्या अपघाताचा धसका अन् आईने जीव सोडला, माय-लेकाचं प्रेम पाहून सारं हळहळलं

## मनसे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांची नाईक कुटूंबास सांत्वन भेट

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

नालासोपारा आईचं आपल्या मुलांवर जीवापाड प्रेम असते. ती कधीच आपल्या मुलांना त्रास झालेला पाहू शकत नाही. पण, जेव्हा एका आईला आपल्याच मुलाचा अपघात झाल्याचे कळताच त्यापेक्षा वेदनादायी या जगात काही नाही असं म्हणतात. हे दु:ख पचवणं जवळपास अशक्य असतं. असंच काहीसं नालासोपारा येथिल समेळपाडा येथे घडलं आहे. जिथे आपल्या मुलाच्या अपघाताचा आईने इतका धसका घेतला की आपले प्राण त्यागले
शिवसेनेच्या माजी शहरप्रमुख रूचिता नाईक यांचे पती अमित नाईक वय ३२ याचा उमराळे रोड नालासोपारा येथे अपघात झाला हे त्यांच्या आईला कळताच मयुरा (माई ) नाईक वय ६२ यांची प्रकृती आधीच खालावली असताना अपघात घटनेची माहिती मिळताच व मुलाला बघताच आईनेही आपले प्राण सोडले. अशाप्रकारे मृत्यू झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. या घटनेने एकच शोककळा पसरली आहे. सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. मनसेचे अविनाश जाधव यांनी नाईक कुटूंबाची सांत्वन भेट घेत आधार दिला. याभेटीमुळे नुकत्याच शिवसेनेतून बाहेर पडलेल्या रूचिता नाईक यांच्या कुटूंबाची भेट घेतल्याने राजकीय चर्चांना उधान आले आहे. अशा परिस्थितीत वैभव पवार यांनी मोफत रूग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देत व सामाजिक कार्यकर्ते एकत्र येत नातेवाईकांनी अंत्यसंस्कार केले.



## महाशिवरात्री निमित्त शिवालय दुमदुमली

# उत्तरेश्वर प्रिंपी येथे भाविकांची मोठी गर्दी प्रशासन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सज्ज

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाशिवरात्री निमित्त शिवालय शिव नामाने दुमदुमली आहेत.महा शिवरात्रीच्या पावन पर्वा निमित्त उत्तरेश्वर प्रिंपी येथील प्राचीन शिव मंदिरात भाविकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी उसळली आहे.पहाटे पासूनच हर हर महादेव च्या जयघोषाने परिसर दुमदुमला असून हजारो भक्त भगवान शंकराच्या दर्शनासाठी रांगेत उभे आहेत.मंदिर परिसरात आकर्षक रोषणाई, फुलांची सजावट आणि धार्मिक वातावरणामुळे भक्तांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे. महिलांसह युवक-युवती आणि ज्येष्ठ नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित असून अनेकांनी रात्रभर जागरण करून अभिषेक व पूजा अर्चा केली. शिवलिंगावर बेलपत्र,दूध, दही,मध व पवित्र जल अर्पण करून भाविकांनी मनोभावे प्रार्थना केली. काही भक्तांनी उपवास पाळत महादेवाचे नामस्मरण केले.मंदिर समितीच्या वतीने दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.




कीर्तन,भजन आणि हरिपाठ यामुळे वातावरण अधिक भक्तिमय झाले आहे.भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता स्थानिक प्रशासनानेही योग्य ती खबरदारी घेतली आहे.पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून वाहतूक व्यवस्थे साठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे.गर्दी नियंत्रणासाठी स्वयं सेवकांची नियुक्ती करण्यात आली असून दर्शनासाठी स्वतंत्र रांगा तयार करण्यात आल्या आहेत.महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.आरोग्य विभागाच्या वतीने प्राथमिक उपचार केंद्र सुरू करण्यात आले असून आपत्कालीन परिस्थितीसाठी रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आली आहे. स्वच्छता राखण्यासाठी ग्रामपंचायत व स्थानिक कर्मचारी सतत कार्यरत आहेत.पिण्याच्या पाण्याची तसेच प्रसाद वितरणाची व्यवस्था सुरळीतपणे पार पडत आहे.भाविकांच्या सेवेसाठी विविध सामाजिक संस्थांनीही पुढाकार घेतला आहे. काही ठिकाणी मोफत पाणी,चहा व फराळाचे वाटप करण्यात येत आहे. स्वयंसेवक भाविकांना मार्गदर्शन करत असून शिस्तबद्ध दर्शनासाठी सहकार्य करत आहेत.महाशिवरात्रीच्या निमित्ताने उतरेश्वर प्रिंपी येथे भक्ती,श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचे दर्शन घडत आहे. प्रशासन,मंदिर समिती आणि ग्रामस्थ यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे उत्सव शांततेत आणि व्यवस्थित पणे पार पडत आहे. महादेवाच्या कृपेने सर्वांच्या मनोकामना पूर्ण होवोत,अशी भावना भाविकांकडून व्यक्त केली जात आहे.ही यात्रा आणखी दोन दिवस असणार आहे.

# श्री स्वामी समर्थ केंद्र सारणी(आनंदगाव) येथे मोफत आरोग्य शिबीर संपन्न

## सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचा स्तुत्य उपक्रम

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

परमपूज्य गुरुमाऊलींच्या आशीर्वादाने व गुरुपुत्र आदरणीय दादासाहेब यांच्या आदेशानुसार सद्गुरू प.पू.मोरे दादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर आयोजित मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबिर केज तालुक्यातील सारणी (आनंदगाव) मोठ्या प्रतिसादात संपन्न झाले.या शिबीराची सुरुवात दिपप्रज्वलन व धन्वंतरी पूजन करुन झाले यावेळी सद्गुरू प.पू.मोरे दादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वरचे डॉ.मोहनराव गौरकर,डॉ.श्रीकांत सलोने, सरपंच पती संतोष अण्णा सोनवणे,ग्राम पंचायत सदस्य गोकुळ सोनवणे, शालेय समितीचे अध्यक्ष अशोकगायकवाड तसेच प.पू.गुरु माऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज कॅन्सर रिसर्च सेंटरचे डॉक्टर टीम, आरोग्य दूत जिल्हा प्रतिनिधी शिवशंकर भंडारे इत्यादी उपस्थित होते.यावेळी सरपंच पती अण्णा संतोष सोनवणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.व डॉ. मोहनराव गौरकर,यांनी सद्गुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर,जनकल्याण योजना व आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. यावेळी गावातील किरण सोनवणे,विकाससोनवणे, जनार्धन सोनवणे,धनंजय सोनवणे,शामसुंदर सोनवणे सर्व ग्रामस्थ महिला,पुरुष,नागरिक, सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याशिबीराचे सुत्रसंचलन व नियोजन श्रीराम सोनवणे यांनी केले.हे शिबिर यशस्वी करण्यासाठी स्थानिक सर्व ग्रामस्थ व कार्यरत सेवेकऱ्यांनी परिश्रम घेतले.



# आंतरराष्ट्रीय लेक्रोस खेळामध्ये केजची कन्या कु.साक्षी कराड चा डंका, सुवर्णपदक पटकावत भारताने उडविला पाकचा धुव्वा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज येथील बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळ केज संचलित साने गुरुजी निवासी विद्यालयातील कु.साक्षी उद्धवराव कराड ने दि.१ ते ४ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान सऊदी अरेबिया ची राजधानी रियाद येथे पार पडलेल्या आशियाई लेक्रोस स्पर्धेत भारतीय संघाने ऐतिहासिक कामगिरी नोंदवली आहे. अंतिम सामन्यात पाकिस्तान चा २२ - ०५ असा धुव्वा उडवत भारतीय महिला संघाने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.या विजयी संघात केजची कन्या कु.साक्षी उद्धवराव कराड याने इन मध्ये खेळुन उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून या विजयात मोलाचा वाटा उचलला आहे.त्यांच्या या सुवर्ण यशाचे क्रीडा प्रेमींकडुन भरभरून कौतुक होत आहे.विशेष म्हणजे भारतीय क्रीडा इतिहासात प्रथमच महिला आणि पुरुष आशा दोन्ही लेक्रोस संघांनी एकाच वेळी सुवर्णपदक मिळवून इतिहास निर्माण केला आहे.या विजया शमुळे महिला व पुरुष या दोन्ही लेक्रोस संघाना २०२८च्या आलंपिक मध्ये लेक्रोस खेळाचा समावेश असल्याने भारताचा हा विजय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.या यशाबद्दल कु.साक्षी कराड चे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे सरचिटणीस आदित्य दादा पाटील,भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष राहुल भैय्या सोनवणे,युवा नेते पशुपतीनाथ दांगट,संस्थेचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड,उपाध्यक्ष राजेश कापसे,संकुल प्राचार्या डॉ.कविता कराड,प्रविण कुमार शेप,प्रताप मोरे सर,बाळासाहेब ठोंबरे, संगिता साळवे,साने गुरुजी निवासी विद्यालय केज परिवारातील सर्व सदस्यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या आहेत.



# धनगर समाजाचा लढा कमजोर करीत असलेल्यांना बरोबर घ्यायचे की नाही, ते राज्य समितीने ठरवा

## संघर्ष योद्धे दीपक बोर्हाडे शिर्डी राज्यव्यापी बैठकीत कडाडले

दैनिक वादळ वार्ता
**पाथर्डी । प्रतिनिधी**

धनगर समाजाच्या एस.टी. आरक्षण मुक्ती संग्राम लढ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी येथे नुकतीच राज्यव्यापी बैठक पार पडली. मुंबई येथील आझाद मैदानावर होणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आणि राज्यस्तरीय नियोजनासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून मोठ्या संख्येने कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते.बैठकीची सुरुवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे दीपप्रज्वलन व पूजन करून झाली. प्रारंभी प्रास्ताविक अहिल्यानगर जिल्हा नामांतर कृती समितीचे प्रमुख विजय तमनर यांनी केले. त्यांनी २१ जानेवारी रोजी जालना ते मुंबई या एस.टी. आरक्षण लढ्यात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांवरील सरकारी कारवाई, पोलिस प्रशासनाचा त्रास आणि समाजातील काही घरभेद्यांनी बजावलेली 'भीषण' भूमिका यांचा तपशीलवार आढावा घेतला.यावेळी संघर्ष योद्धे दीपक बोर्हाडे यांनी भाषणात समाजातील अंतर्गत मतभेद आणि दुटप्पी भूमिका घेणाऱ्यांवर जोरदार टीका केली. ते म्हणाले,आपल्या लढ्याला कमजोर करीत असलेल्यांना या आरक्षणाच्या लढ्यात सहभागी करून घ्यायचे की नाही, हे राज्य समितीने ठरवावे.

मी धनगर समाजाच्या स्वाभिमानाला कोणत्याही प्रकारचा डाग लागू देणार नाही. मुंबईतील आंदोलनाच्या वेळी मी सरकारशी चर्चा करण्यासाठी पुढे जाणार नाही. त्यांनी उपोषणाच्या मंचावर येऊन सर्वांसमोर बोलावे.बोर्हाडे पुढे म्हणाले,मला नेता होण्याची हौस नाही. प्रत्येक जिल्ह्यात, तालुक्यात आणि गावागावात नेते तयार झाले पाहिजेत. पण ते घरात बसून नव्हे, तर समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन चळवळीत सातत्याने सहभागी होत संघर्ष योद्धे बनले पाहिजेत. मी लवकरच संपूर्ण राज्यभर संघर्ष यात्रा काढणार आहे. प्रत्येक बांधवाने या यात्रेत सहभागी व्हावे,




समाजाच्या भावना जाणून घ्याव्यात आणि शंभर टक्के ताकदीने मुंबईत होणाऱ्या आंदोलनात उतरावे.बैठकीत अण्णासाहेब खेमनर (धुळे), पत्रकार सुनिल धनगर (नंदुरबार), रामभाऊ पौंधे (नाशिक), भारत आव्हाड, खंडेराव पाटील, मच्छिंद्र बीडगर (नाशिक), शिवकांत मल्होरे (नांदेड), संतोष गोरे (संभाजीनगर), सतिश देवगुंडे, गजानन काळे (बीड), सर्जेराव जाधव, बोरकर मामा (गेवराई), देवराज फकडे, भगवान हाके (जालना), अशोक पातोड, तसेच उत्तर प्रदेश येथून आलेले शेफर्ड समाज नेते दामू पाल, मंगल पाल, अनिल पाल, योगेंद्र पाल, ठाकूर पाल यांसह महादेव यादव, ज्ञानेश्वर बाचकर, लक्ष्मण पवाडे, विश्वनाथ वाघ, आनंद बनसोडे, छगन पानसरे, श्रीराम देशमुख यांनी आपले विचार मांडले.दीपक बोर्हाडे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की,हा लढा कोणत्याही व्यक्तीविरोधात नाही, तर आपल्या लेकराबाळांच्या भवितव्यासाठी आहे. समाजाच्या नावावर दुकानदारी करणाऱ्यांना मात्र या चळवळीत स्थान नाही. समाजातील सर्व स्तरांतील नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी, प्रतिनिधींनी आतून या लढ्याला बळ द्यावे. प्रत्येक जिल्ह्यात एक आमदार आणि प्रत्येक विभागात एक खासदार समाजातून तयार झाला पाहिजे.शेवटी राज्यभरातून आलेल्या सर्व धनगर बांधवांनी दीपकभाऊ बोर्हाडे यांच्या गळ्यात पुष्पहार घालून त्यांचा सन्मान केला. साई पालखी निवारा, शिर्डी येथे पार पडलेल्या या बैठकीच्या शेवटी उपस्थित कार्यकर्त्यांनी समाजाच्या नावावर राजकारण करणाऱ्यांपासून दूर राहण्याची आणि दीपकभाऊ बोर्हाडे यांच्या नेतृत्वाखाली लढा पुढे नेण्याची शपथ घेतली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स. मि. ना. कोळपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिर्डी येथील समाजबांधवांनी मानले.

# नागभीड तालुक्यातील गायमुख देवस्थानचा पवित्र झरा बंद; भाविकांमध्ये नाराजी

दैनिक वादळ वार्ता
**तळोधी (बा) । प्रतिनिधी.**




नागभीड तालुक्यातील डोंगराच्या पायथ्याशी वसलेले, निसर्गरम्य वातावरणात असलेले प्रसिद्ध गायमुख देवस्थान येथील गायमुख पाण्याचा पवित्र झरा अलीकडे पूर्णतः बंद पडल्याने भाविकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. वर्षानुवर्षे अखंड वाहणारा हा झरा अचानक बंद झाल्याने परिसरातील धार्मिक वातावरणावरही परिणाम झाला आहे.गायमुख देवस्थानातील हा झरा बारा महिने नियमितपणे सुरू असतो. मात्र दरवर्षी गायमुखच्या शेजारी असलेल्या शेतामध्ये उन्हाळी पीक घेतले जाते. या काळात काही दिवस गाईच्या मुखातून येणारे पाणी बंद होते, अशी अनेक लोकांची तक्रार आहे. तरीही पीक काढणीनंतर झरा पुन्हा सुरू होत असल्याने भाविक समाधान मानत होते. मात्र यावर्षी परिस्थिती गंभीर बनली आहे. मागील वर्षी २२ जानेवारी २०२४ रोजी( राम लल्ला दिवस)हा झरा बंद पडला होता. काही दिवसांनंतर तो पुन्हा सुरू झाला, परंतु आता मात्र सर्व दिवसांपूर्वी येणारे पाणी पूर्णतः बंद झाले असून झरा कोरडा पडला आहे. त्यामुळे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांचा मोठा हिरमोड झाला आहे.या देवस्थानाला धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. दरवर्षी मकर संक्रांतीनिमित्त येथे मोठी यात्रा भरते. यात्रेदरम्यान भाविकांची अफाट गर्दी होत असून विविध प्रकारची दुकाने, फेरीवाले आणि धार्मिक कार्यक्रमांनी परिसर गजबजून जातो. गायमुखच्या पवित्र पाण्याला स्नान व आचमनासाठी विशेष महत्त्व असल्याने झरा बंद होणे ही बाब भाविकांसाठी अत्यंत चिंतेची ठरत आहे. स्थानिक नागरिक व भाविकांनी प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन पाण्याचा झरा बंद होण्यामागील नेमके कारण शोधावे, तसेच शेजारील शेती व पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाचा समन्वय साधून गायमुखचा झरा कायमस्वरूपी सुरू राहील यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. अन्यथा येणाऱ्या यात्रेच्या काळात भाविकांच्या श्रद्धेला मोठा धक्का बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# भाजप किसान मोर्चाचा इशारा, रस्त्याचे काम आठ दिवसात सुरु नाही झाल्यास रास्ता रोको

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

संगोबा ते वाघाची वाडी आणि बोरगाव-पाडळी रस्त्याची खराब स्थिती तसेच दुरुस्तीच्या कामात होत असलेल्या विलंबामुळे भाजप किसान मोर्चाने प्रशासनाला कठोर इशारा दिला आहे. संघटनेचे जिल्हा सरचिटणीस अण्णासाहेब सुपनवर यांनी जाहीर केले की, आठ दिवसांच्या आत या रस्त्याचे काम चालू न झाल्यास बोरगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल.सुपनवर यांनी सांगितले की, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या कारकिर्दीत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत संगोबा ते वाघाची वाडी आणि बोरगाव-घारगाव-पाडळी हे रस्त्यांचे काम झाले होते. तथापि, कालांतराने या रस्त्यांची स्थिती अतिशय दयनीय झाली आहे.

खडी वाहतुकीने रस्त्याचा चीरपोश :
काटेवाडी-परांडा येथील खडी क्रेशरमधून दररोज पाच-सहा ट्रक ब्रास खडी वाहतूक करत असल्याने रस्त्याचा मोठा नाश झाला आहे. रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. खड्ड्यात रस्ता आहे की रस्त्यात खड्डे आहे हेच कळत नाही, अशी तक्रार सुपनवर यांनी व्यक्त केली.हा रस्ता करमाळा



ते मराठवाड्याला जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे आणि येथे जोमदार वाहतूक होते. रस्त्याच्या धुळीमुळे स्थानिक ग्रामस्थांना आजार पडू लागले आहेत, तर शालेय विद्यार्थ्यांचीही यामुळे गैरसोय होत आहे.सुपनवर यांनी स्पष्ट केले की, प्रशासनाने या आठ दिवसात रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू केले नाही तर, बोरगाव, वाघाचीवाडी, दिलमेश्वर, पाचवड, काठेवाडी, तांदळवाडी, घारगाव, पाडळी, कोकरवाडी आदी गावांच्या ग्रामस्थांना घेऊन बोरगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.या घोषणेच्या वेळी बोरगावचे सरपंच विनय ननवरे, बाळासाहेब वाघ, देविदास वाघ, गजानन महाराज, सुनील भोगल, आदेश भोगल, समाधान देशमुख, संजय गायकवाड, संभाजी डवले, काका भोगल, पप्पू मस्के, राजेंद्र भोज, राजेंद्र वाळुंजकर, अण्णासाहेब केसकर, किरण केसकर, प्रवीण होगले, जीवन होगले, रमेश होगले यांसह विविध ग्रामस्थ हजर होते.

# करमाळा शहर हद्दवाढीची भाजप नगरसेविका स्वाती महादेव फंड यांची मागणी; व्होटकर पुल-श्रीदेवीचामाळ रस्ता नगरपरिषदेकडे देण्याचा प्रस्ताव

दैनिक वादळ वार्ता
**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा शहराची हद्दवाढ करून शहरालगत विकसित झालेल्या ग्रामीण भागाचा नगरपरिषदेच्या हद्दीत समावेश करावा, तसेच डॉ. व्होटकर पुल ते श्रीदेवीचामाळ रस्ता नगरपरिषदेकडे हस्तांतरित करून त्या मार्गावर मध्यभागी डिव्हायडर आणि स्ट्रीट लाईटची व्यवस्था करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीच्या नगरसेविका स्वाती महादेव फंड यांनी नगराध्यक्षा, मुख्याधिकारी व नगरपरिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे केली आहे.निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, करमाळा शहरालगतच्या ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर प्लॉटिंग होऊन सुमारे एक ते दीड किलोमीटर परिसरात नागरी वस्ती निर्माण झाली आहे. अनेक घरे व बंगले उभारले गेले असले तरी हा भाग शहर हद्दीबाहेर असल्याने नागरिकांना गटारी, पाणीपुरवठा, रस्ते, वीज आदी मूलभूत सुविधा नियमितपणे मिळत नाहीत. परिणामी स्थानिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे.या ग्रामीण भागाचा शहर हद्दीत समावेश झाल्यास नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा पुरविणे शक्य होईल, तसेच नगरपरिषदेच्या महसुलात वाढ होऊन शहराच्या विकासालाही चालना मिळेल, असे नगरसेविका स्वाती महादेव फंड यांनी निवेदनात नमूद केले आहे. यासंदर्भात नगरपरिषदेकडून ठराव मंजूर करून शासनस्तरावर प्रस्ताव पाठविण्याची मागणीही त्यांनी केली आहे.दरम्यान, करमाळ्याचे आराध्य दैवत श्री कमलाभवानी मंदिर ते शहर हद्दीतील डॉ. व्होटकर पुल या दरम्यानचा रस्ता सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. हा रस्ता नगरपरिषदेकडे हस्तांतरित करून मध्यभागी डिव्हायडर उभारावा तसेच स्ट्रीट लाईटचे पोल बसवावेत, अशीही मागणी सौ. फंड यांनी केली आहे. मंदिराकडे जाणाऱ्या भाविकांची मोठ्या प्रमाणावर होणारी वर्दळ लक्षात घेता सुरक्षित, सुसज्ज आणि प्रकाशमान रस्ता तयार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.वरील दोन्ही विषय नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेच्या अजेंड्यावर घेऊन त्यावर सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी भाजप नगरसेविका स्वाती महादेव फंड आणि सामाजिक कार्यकर्ते महादेव (आण्णा) फंड यांनी एकत्रितपणे केली आहे.



# प्राचार्य मिलिंद फंड यांना पितृशोक

दैनिक वादळ वार्ता

**करमाळा (प्रतिनिधी)**–अर्जुन (तात्या) जोतिबा फंड (वय ८६, रा. करमाळा) यांचे आज सकाळी आठ वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते कर्मवीर अण्णासाहेब जगताप विद्यालय, करमाळा येथील गणित विषयाचे शिक्षक होते.त्यांनी आपल्या शिक्षक कारकिर्दीची सुरुवात पळसदेव (ता. इंदापूर) येथून केली होती. निवृत्तीनंतरही शिक्षणाची आवड कायम ठेवत त्यांनी विद्यार्थ्यांना मोफत ट्युशन देण्याचे कार्य सुरू ठेवले. त्यांचा स्वभाव नम्र, कर्तव्यनिष्ठ आणि विद्यार्थ्यांवर प्रेम करणारा असल्याने ते सर्वत्र आदराने पाहिले जात होते.त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले प्राचार्य मिलिंद फंड, मुकुंद फंड, शशिकांत फंड तसेच नातवंडे असा आप्तस्वकीय परिवार आहे.अंत्यविधी आज दुपारी दोन वाजता विकास नगर येथील स्मशानभूमीत पार पडला. या वेळी विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, नगराध्यक्ष संजय सावंत, उपनगराध्यक्ष अतुल फंड, नगरसेवक महादेव फंड, प्राचार्य जयप्रकाश बिले, उपप्राचार्य संभाजीराजे किर्दक, प्रभारी अभिमन्यू माने, मनसेचे संजय घोलप, माजी नगरसेवक राहुल जगताप, माजी मुख्याधिकारी कवडे, माजी उपसभापती संजय जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.अर्जुन तात्या फंड यांच्या निधनाने करमाळा शहरातील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.



# रोहा तालुक्यात चोरांचा सुळसुळाट; भारतीय जनता पक्षाची पोलिसांसोबत बैठक व निवेदन

दैनिक वादळ वार्ता
**रोहा । प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात अलीकडे चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून, या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने रोहा पोलीस ठाण्यात पोलिस निरीक्षक मारुती पाटील यांची भेट घेऊन परिस्थितीवर चर्चा करण्यात आली.शहर व तालुक्यात घडलेल्या घरफोड्या आणि चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. या संदर्भात झालेल्या बैठकीत रात्रीची गस्त अधिक प्रभावी करणे, संशयित व्यक्तींवर विशेष लक्ष ठेवणे, सीसीटीव्ही फुटेज तपासणीला गती देणे तसेच संवेदनशील भागात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त ठेवण्याची



मागणी करण्यात आली.या बैठकीस भाजप रोहा तालुका अध्यक्ष अमितदादा घाग, रोहा-धाटाव विभाग अध्यक्ष सचिनदादा मोरे, युवा मोर्चा तालुका सरचिटणीस वैभव कुलकर्णी, युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष दिपक मोरे, रोहा नगरपरिषदेचे नगरसेवक रोशन चाफेकर आदी मान्यवर उपस्थित होते.पोलीस निरीक्षक मारुती पाटील यांनी चोरीच्या घटनांचा तपास गतीमान असून डॉग स्क्वाड व तांत्रिक पथकाच्या मदतीने तपास सुरू असल्याचे सांगितले. आरोपींना लवकरच जेरबंद केले जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास त्वरित स्थानिक पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. रोहा तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासन पूर्णपणे सज्ज असून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# महाराष्ट्रात वीज १६ टक्क्यांनी महाग होणार काँग्रेस नेत्याचा महायुती सरकारवर गंभीर आरोप

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

अरविंद बनसोडे कुरनूरकर: आज उन्हाळा सुरू होण्याआधीच वीजपुरवठा दरावरून आता राजकीयदृष्ट्या वातावरण तापण्याची चिन्ह आहे.आज वीजदर कमी करण्याचे जाहीर करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून जनतेची फसवणूक केली आहे. वीज स्वस्त नाही तर १६ टक्क्यांनी महाग होणार आहे , असा दावा काँग्रेसचे नेते अतुल लोंढे यांनी केला आहे. तसंच, महाराष्ट्रापेक्षा कर्नाटक, तेलंगणा, गुजरातमधील वीज दर स्वस्त कशी काय? असा सवालही लोंढेंनी उपस्थिती केला आहे.यामुळे या राज्यातील वीज दरवाढीवरून राजकारण तापणार असल्याचं चित्र आहे. काँग्रेस नेते अतुल लोंढे यांनी पत्रकार परिषद घेऊन वीज दर वाढीबद्दल राज्य सरकारवर गंभीर आरोप केले आहे. राज्यात वीज दर २० ते ४० टक्क्यांनी वाढणार असल्याचा आरोप करत सामान्य माणसाची कंबर मोडण्याचा निर्णय सरकार घेत असल्याचं त्यांनी म्हटलंय.

राज्यातील वीज ग्राहकांना स्वस्त वीज मिळेल असेल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले होते. ५ वर्षांत विजेचे दर एकूण ५० टक्क्यांनी कमी केले जातील आणि पहिल्या वर्षी १० टक्क्यांची कपात केली जाईल असं सागितलं होतं पण वस्तुस्थिती याच्या उलट आहे. वीजदर कमी होणार नसून ते १६ टक्क्यांनी महाग होणार आहेत, असा गंभीर आरोप करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणविसांनी यावर खुलासा करावा अशी मागणी अतुल लोंढे यांनी केली.

वीज दर तुलना : महाराष्ट्र विरुद्ध शेजारील राज्य
(राज्ये : महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तेलंगणा)

घरगुती वीज दर
महाराष्ट्र : ४.४ ते १२.८+ फ वरच्या स्लॅबमध्ये जास्त दर
गुजरात : ३.० ते ५.२-मध्यम दर
कर्नाटक : ३.७ ते ७.३-मध्यम श्रेणी
तेलंगणा : २.० ते १०.०-सुरुवातीचा दर कमी

व्यावसायिक वीज दर (Commercial)
महाराष्ट्र : ५ ते १८-TOD/डिमांड चार्जचा मोठा परिणाम
गुजरात : ४.३ ते ६.०-तुलनेने स्थिर



कर्नाटक : ७ ते ८-ESCOM वर अवलंबून
तेलंगणा : ७.५ ते ९.५-लोडनुसार दर

औद्योगिक वीज दर (Industrial)
महाराष्ट्र : ७.३ ते ८.३-स्पर्धात्मक होत आहेत
गुजरात : ४.० ते ६.०-HT ऊर्जा दर कमी
कर्नाटक : ६.९ ते ७.३ -HT/LT प्रकारानुसार
तेलंगणा : ७ ते ११-स्लॅब फरक मोठा

**महाराष्ट्रातच वीज महाग का?**

देवेंद्र फडणवीस यांच्या कथनी व करनीत फरक आहे. पाच वर्षात वीज दर कमी करणार, शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार असे जाहीर केले होते. पण महावितरणने (चडएऊङ) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे (एमईआरसी) २० ते ४० टक्के वीज दर वाढीचा प्रस्ताव सादर केला आहे, त्यासंदर्भातील जनसुनावणी नागपुरात झाली असून हा सर्व खटाटोप उद्योजकांच्या फायद्यासाठी केला जात आहे. यातून राज्यातील सर्वसामान्य वीजग्राहक आणि छोटे, मध्यम, लघु उद्योगाचे कंबरडे मोडणार आहे. आधीच महागाई, बरोजगारीने पिचलेल्या जनतेवर फडणवीस यांनी वीज दरवाढीचा भार टाकण्याचा घाट घातला आहे. शेजारच्या गुजरात, कर्नाटक, तेलंगणा राज्यात महाराष्ट्रापेक्षा वीजेचे दर कमी आहेत. गुजरामध्ये घरगुती वीज दर ३.० ते ५.२ रुपये प्रति युनिट, कर्नाटकात ३.७ ते ७.३ रुपये प्रति युनिट, तेलंगणात २ ते १० रुपये प्रति युनिट दर असताना महाराष्ट्रात तेच दर ४.४ ते १२.८ रुपये प्रति युनिट आहेत. वीज निर्मितीसाठी लागणारा खर्च सर्व राज्यात सारखा असताना महाराष्ट्रातच वीज महाग का? असा सवालही लोंढेंनी उपस्थितीत केला.

महाराष्ट्र हे संपूर्ण देशात सर्वात महाग वीज दर असलेले राज्य आहे, ज्यामुळे अनेक नवीन उद्योग राज्यात येण्यास तयार नाहीत. अनेक विद्यमान उद्योगही इतर राज्यांत स्थलांतराच्या विचारात आहेत, परिणामी राज्यात बेरोजगारी वाढत आहे. MERC च्या नव्या सुधारित आदेशामुळे विद्यमान वीज दरात २० टक्के ते ४० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. लघु आणि मध्यम उद्योग (SME) जे राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहेत, त्यांच्यावर याचा थेट परिणाम होऊन संपूर्ण यंत्रणाच कोसळू शकते, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली.

# लाज वाटावी असा प्रकार! पत्रकाराच्या नावावर घरकुल निधी उचलला

## केज नगरपंचायतीत गंभीर आरोप

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीचा कारभार म्हणजे भ्रष्टाचाराचे माहेरघर असल्याचे पुन्हा एकदा उघडकीस आले आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या घरकुल लाभार्थी पत्रकार प्रकाश मुंडे यांच्या नावावर आलेला निधी तत्कालीन मुख्याधिकारी, संबंधित कर्मचारी व स्थानिक पुढाऱ्यांच्या संगनमताने उचलण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे. प्राप्त माहितीनुसार, पत्रकार प्रकाश मुंडे यांना घरकुल योजनेअंतर्गत मंजुरी देण्यात आली होती. मात्र प्रत्यक्षात त्यांना कोणतेही घरकुल लाभ न देता त्यांच्या नावावर जमा झालेली शासकीय रक्कम संबंधित



अधिकाऱ्यांनी व पदाधिकाऱ्यांनी बेकायदेशीररीत्या काढून घेतल्याचे समोर आले आहे. यामुळे शासनाच्या योजनेचा गैरवापर होऊन लाभार्थ्याची थेट फसवणूक झाल्याचे स्पष्ट होते.

या प्रकरणामुळे केज नगरपंचायतीतील भ्रष्टाचाराचा आणखी एक धक्कादायक प्रकार उजेडात आला असून, गरिबांसाठी असलेल्या योजनांचा कसा गैरवापर केला जातो याचे जिवंत उदाहरण समोर आले आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिक व पत्रकार संघटनांकडून करण्यात येत आहे.


जर या आरोपांना दुजोरा मिळाला तर तत्कालीन मुख्याधिकारी, कर्मचारी व संबंधित पुढाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल होण्याची शक्यता आहे. प्रशासनाने याबाबत तात्काळ चौकशी सुरू करून सत्य बाहेर आणावे, अशी मागणी जोर धरत आहे.

# संत श्रीसेवालाल महाराजांची जयंती बदामराव पंडितांच्या उपस्थितीत साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**गेवराई । प्रतिनिधी**

संत श्री सेवालाल महाराज यांची जयंती भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या उपस्थितीमध्ये त्यांच्या संपर्क कार्यालयात उत्साहात साजरी करण्यात आली.

दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी संत सेवालाल महाराज यांची जयंती माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या गेवराई येथील संपर्क कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी संत सेवालाल महाराज यांच्या प्रतिमेला माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्यासह युवा नेते रोहित पंडित, माजी जि प सदस्य शामराव राठोड, नगरपरिषद सभापती शेख शेहदाद, कैलास राठोड, संतराम महाराज, विनायक चव्हाण, शेख सुलेमान, राजू टकले, सुरज भुतडा, विकास राठोड, दत्ता राठोड, ज्ञानेश्वर राठोड, विजय राठोड, राजू जाधव, बजरंग सानप, पंडित पवार, अमोल सुतार, जगन्नाथ गीते,



शेख नविद, शिवाजीराव चव्हाण, रामदास मस्के, आप्पासाहेब शिंदे, जगन्नाथ जाधव, काशिनाथ बनसोडे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्पहार व पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी बोलताना बदामराव पंडित म्हणाले की, संत श्री सेवालाल महाराज यांनी सामाजिक ऐक्य आणि एकमेकांना मदत करण्याची दिलेली शिकवण ही केवळ बंजारा समाज नाही तर इतर समाजाने सुद्धा आत्मसात करावी. ऊसतोड मजूर आणि मुकादमांची मोठी संख्या असलेल्या बंजारा समाज बांधवांनी याच शिकवणीवर उच्च शिक्षण, नोकरी आणि उद्योग व्यवसायातही प्रगती केली असल्याचे ते म्हणाले. याप्रसंगी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाशिवरात्रीनिमित्त १५ फेब्रुवारी २०२६ रोजी अजंदे गावात शिवभक्तीचा मोठा जल्लोष

**दैनिक वादळ वार्ता**
**जळगाव । जितु इंगळे**

अजंदे तालुका रावेर जिल्हा जळगाव श्री काशी विश्वनाथ महादेव मंदिर येथे बिरपण कर परिवारातर्फे साबुदाणा खिचडी वाटप करण्यात आली. महाशिवरात्रीनिमित्त १५ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्रभरात शिवभक्तीचा मोठा जल्लोष .पाहायला मिळत आहे. पहाटेपासूनच अजंदे येथे श्री काशी विश्वनाथ मंदिर अजंदे शिवमंदिरांमध्ये दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी उसळली आहे ओम नमः शिवाय'च्या गजराने परिसर दुमदुमून गेला असून बेलपत्र, दूध आणि फुलांनी महादेवांची विशेष पूजा केली जात आहे.पौराणिक कथेनुसार, या रात्री शिव आणि सतीचा विवाह झाला होता, तसेच शिवाने तांडव नृत्य केले होते, त्यामुळे या रात्रीला विशेष आध्यात्मिक महत्त्व आहे .अज्ञानावर ज्ञानाचा विजय म्हणून हा सण साजरा केला जातो आज मंदिरावर सकाळपासून सर्व भाविक भक्तांना बसेस टू व्हीलर. फोर व्हीलर . साबुदाणा फराळ केळे . इत्यादी प्रसादाच्या रूपात देण्यात येत आहे.मंदिर परिसरात स्वयंसेवी यांच्याकडून पिण्याच्या पाण्याची आणि प्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. काही शहरांमध्ये वाहतुकीचे विशेष नियोजन



करण्यात आले असून प्रमुख रस्त्यांवर वाहतूक बदल करण्यात आला आहे. रेल्वे आणि बसस्थानकांवरही प्रवाशांची मोठी गर्दी दिसून येत आहे. कोविडनंतर प्रथमच अनेक ठिकाणी निर्बंधांशिवाय मोठ्या प्रमाणावर महाशिवरात्री साजरी होत असल्याने भाविकांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत आहे. लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वच जण भक्तिभावाने मंदिरांकडे वळले आहेत. एकूणच, देशभरात महाशिवरात्री निमित्त धार्मिक वातावरण निर्माण झाले असून भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचा संगम पाहायला मिळत आहे. तसेच रवींद्र बिरपण.विक्रांत बिरपण.मोहित बिरपन बिरपणकर परिवारातर्फे चांगल्याचर प्रकारे सर्व नियोजन करण्यात आले प्रशासनाकडून सुरक्षेची काळजी घेतली जात असून सण शांततेत आणि आनंदात पार पडत आहे.

# कै.अजित दादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून देगलुरच्या सामाजिक कार्यकर्त्याची तिरुमला चरणी प्रार्थना

**दैनिक वादळ वार्ता**
**देगलुर । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री कै.अजित दादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभावी, या भावनेतून देगलुर येथील सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी आंध्रप्रदेशातील तिरुपती तिरुमला बालाजी येथे श्रद्धांजली अर्पण केली.सामाजिक कार्यकर्ते धनाजी जोशी यांनी तिरुमला येथे सुमारे ३५५० पायऱ्या (अंदाजे १२ किलोमीटर अंतर) अवघ्या पाच तासांत पायी चढून भगवान तिरुपती तिरुमला बालाजी यांच्या चरणी नतमस्तक होत कै. अजित दादा पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी प्रार्थना केली. या पायी यात्रेद्वारे त्यांनी श्रद्धा,समर्पण आणि सामाजिक जाणीव यांचा आदर्श घालून



दिला आहे. त्यांच्या या भावनिक व श्रद्धापूर्ण उपक्रमाबद्दल देगलुर परिसरातून कौतुक व्यक्त करण्यात येत असून अनेकांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले आहे.

# चित्रपट निर्मात्याने वकिलाला दिलेला चेक वटला नाही-तीन महिने जेल अन् तीन लाख दंड

## चित्रपट निर्मितीसाठी वकिला कडून घेतलेल्या पैशामुळे चित्रपट निर्मात्याच्या आयुष्याची झाली चित्तरकथा!

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

एका चित्रपट निर्मात्याने वकिलांकडून घेतलेले उसने पैसे परत देण्यासाठी दिलेला चेक वटला नसल्याने तब्बल तेरा वर्षां नंतर न्यायालयाने एका चित्रपट निर्मात्याला तीन महिने कारावास आणि तीन लाख रु. दंडाची शिक्षा ठोठावली आहे.या बाबतची माहिती अशी की, धाराशिव जिल्ह्यातील घुगी येथील चित्रपट निर्माते व्यंकट अर्जुन रोंगे ( ह. मु. लातूर ) यांनी अंबाजोगाई येथील विधीज्ञ राम दशरथ थोरात यांच्या कडून त्यांचा मित्र डॉ. मकबूल पठाण यांच्या मध्यस्थीने व समक्ष डिसेंबर २०११ मध्ये चित्रपट निर्मितीसाठी एक लाख रु. उसने घेतले होते. त्या बदल्यात एक वर्षा नंतर दोन लाख रु. देण्याचे कबुल झाले होते. तसेच त्या बदल्यात व्यंकट रोंगे यांनी राम थोरात यांना आयडीबीआय बँकेच्या खात्याचा चेक दि.१०/०१/२०१३ अशी तारीख टाकुन दिलेला होता. त्या नंतर व्यंकट रोंगे यांनी राम थोरात यांना सांगितले की, त्यांनी दि.१०/०१/२०१३ नंतर एक महिन्याने तो चेक वटण्यासाठी लावुन त्याचे पैसे उचलुन घ्यावेत. त्या प्रमाणे राम थोरात याने व्यंकट रोंगे यांनी दि. ११/०२/२०१३ रोजी दिलेला दोन लाख रु. चा चेक वटण्यासाठी बँकेत जमा केला. परंतु खात्यावर पुरेशी रक्कम जमा नसल्यामुळे दि. १३/०२/२०१३ रोजी चेक न वटता अनादरीत होवुन परत आला. त्या बाबत राम थोरात यांनी व्यंकट रोंगे कळवले असता त्याने एक महिन्या नंतर पुन्हा चेक जमा करा असे सांगितले. त्या नुसार राम



थोरात यांनी तोच चेक पुन्हा वटण्यासाठी जमा असता तो दि.१०/०४/२०१३ रोजी खात्यात पुरेशी रक्कम नाही. या कारणाने चेक पुन्हा अनादरीत होवुन परत आला. त्यामुळे राम थोरात यांनी दि. २२/०४/२०१३ रोजी आरोपीला नोंदणीकृत डाकेद्वारे नोटीस पाठविली. सदर नोटीस आरोपीला दि. ०१/०५/२०१३ ते ०६/०५/२०१३ या कालावधीमध्ये लातुर येथील पत्यावर प्राप्त झालेली आहे. तसेच व्यंकट रोंगे यांच्या गावी पाठवलेली नोटीस दि.०७/०५/२०१३ रोजी परत आलेली आहे. मात्र व्यंकट रोंगे यांनी नोटीसची पुर्तता केलेली नाही. त्यामुळे राम थोरात यांनी दि. १५/६/२०१३ रोजी या प्रकरणी ड. गणेश स्वामी यांच्या मार्फत अंबाजोगाई येथील अतिरिक्त न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात व्यंकट रोंगे यांच्या विरुद्ध धनादेश अनादर प्रकरणी दावा दाखल केला होता.त्या नंतर तब्बल तेरा वर्षा नंतर दोन्ही पक्ष आणि त्यांच्या वकिलांच्या युक्तिवाद आणि उपलब्ध पुरावे या आधारे अतिरिक्त मुख्य न्यायाधीश भानुप्रताप बी. चौहान यांनी दि.१२/२/२०२६ रोजी चेक न वटल्या प्रकरणी आरोपी चित्रपट निर्माता म्हणून सांगणारा व्यंकट रोंगे याला तीन महिन्याची शिक्षा आणि तीन लाख रु. ची शिक्षा ठोठावली आहे.पैसे घेणारा चित्रपट निर्माता तर पैसे देऊन फसला वकील :- मराठी चित्रपट निर्मितीसाठी एक लाख रु. उसने घेणारा चित्रपट निर्माता तर पैसे देणारा व्यवसायाने वकील आहे.त्यामुळे चित्रपट निर्मात्याने एका वकिलाला दिलेला चेक न वटल्याने चित्रपट तयार होण्या पूर्वीच निर्मात्याच्या आयुष्याची चित्तरकथा झाली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077